जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 MAY 2017
महाराष्ट्र टाईम्स

# अभियंत्रिकीतील करिअर, प्रवेश प्रक्रिया कार्यशाळा शुक्रवारी

**कोल्हापूर :** तंत्रज्ञान अधिविभाग शिवाजी विद्यापीठ व दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीअर्स, इंडिया कोल्हापूर लोकल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (ता. २) दुपारी ३. २० ते ६. ३० या वेळेत बारावी (सायन्स) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी 'अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी व केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१७' या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. केशवराव भोसले नाटयगृह येथे ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेत अभियांत्रिकीच्या विविध विद्याशाखा व त्यातील संधी तसेच केंद्रीय प्रवेश प्रक्रिया याविषयी विस्तृत मार्गदर्शन व शंकानिरसन करण्यात येणार आहे, तरी विद्यार्थी व पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष

3 1 MAY 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'अभियांत्रिकीतील संधी' विषयावर शुक्रवारी कार्यशाळा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग व दि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१७' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

केशवराव भोसले नाट्यगृहात शुक्रवार २ जून रोजी दुपारी ३.३० ते ६.३० या वेळेत होणाऱ्या कार्यशाळेत बारावी विज्ञान शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थी व पालकांच्या शंकांचे निरसन केले जाणार आहे.

**शिवाजी विद्यापीठातील डीओटी केंद्रातर्फे आयोजन**

अभियांत्रिकीच्या विविध विद्याशाखा व त्यातील संधी तसेच केंद्रीय प्रवेश प्रक्रिया या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन केले जाणार आहे.

तरी जास्तीतजास्त विद्यार्थी व पालकांनी या कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

3 1 MAY 2017 तरुण भारत

# म्युझिओलॉजी व कॉन्झरवेशन प्रशिक्षण वर्गाचे जूनमध्ये आयोजन

## विद्यापीठ हायस्कूलमध्ये ६ महिने प्रशिक्षण वर्ग : मोडी लिपीतील कागदपत्रे, शिलालेख, ताम्रपटांचे वाचन कसे करायचे याचे धडे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्यविभाग आणि राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधनीच्या वतीने म्युझिओलॉजी आणि कॉन्झरवेशन कोर्सचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण वर्ग ४ जूनपासून पुढे ६ महिने दर रविवारी या कालावधीत विद्यापीठ हायस्कूलमध्ये सुरू राहणार आहेत.


मोडी लिपीतील कागदपत्रे, शिलालेख, ताम्रपट यांची केवळ ओळख होऊन चालणार नाही, तर त्याचे जतन करणे आवश्यक आहे. वस्तू संग्रहालयाच्या माध्यमातून अशा दुर्मिळ वस्तुंची जपणूक होते. यासाठी वस्तूसंग्रहालयांमध्ये दुर्मिळ गोष्टी जतन करण्याची पध्दत माहिती असणारे लोक असतात. यादृष्टीने म्युझिओलॉजी आणि कॉन्झरवेशन हा कोर्स महत्वाचा आहे.

या कोसमध्ये ताम्रपटांचे वाचन, शीलालेखांचे वाचन, मोडी लिपीतील कादपत्रांचे जतन कसे करायचे. कोणत्या कागदाची निर्मिती कशी होते. विशिष्ठ कागदपत्रांचे जतन कसे करायचे, त्यासाठी कोणती रसायने वापरायची. कालखंडानुसार कागदपत्रांचे महत्व कसे ओळखायचे. दुर्मिळ नाणी, वस्तू यांचे जतन कसे करायचे या गोष्टींची माहिती प्रत्यक्ष कार्यानुभव दिला जाणार आहे. पुरातत्व शास्त्रातील ज्येष्ठ अभ्यासक या वर्गांमध्ये मार्गदर्शन करणार आहेत. नाव नोंदणी आणि अधिक माहितीसाठी राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधनीचे उदयसिंह राजेयादव यांच्याशी संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 MAY 2017
तरुण भारत



# शिवाजी विद्यापीठाचा नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीचा अभ्यासक्रम



शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीमध्ये उपलब्ध असणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये खालीलप्रमाणे प्रवेश उपलब्ध आहे.

बीएससी-नॅनोसायन्स: बीएससी-एमएससी या एकात्मिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्जदारांनी १२ वीची परीक्षा विज्ञान विषय घेऊन व ते खुल्या वर्गगटातील असल्यास ४५ टक्के गुणांसह (राखीव वर्गगटातील असल्यास ४० टक्के) उत्तीर्ण केलेली असावी अथवा ते विज्ञान विषयांसह बारावीच्या परीक्षेला बसलेले असावेत.

निवड पद्धती: अर्जदारांपैकी पात्रताधारक विद्यार्थ्यांची निवड परीक्षा १५ जून २०१७ रोजी कोल्हापूर व सातारा येथे घेण्यात येईल. अर्जदारांची १२ वीच्या परीक्षेतील गुणांची टक्केवारी व निवड परीक्षेतील गुणांकाच्या आधारे त्यांना बीएससी-नॅनोसायन्स अभ्यासक्रमाच्या २०१७-१८ या शैक्षणिक सत्रात प्रवेश देण्यात येईल.

एमएससी- नॅनोसायन्स: अर्जदारांनी नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र यासारख्या विषयांसह बीएससी पदवी ते सर्वसाधारण गटातील असल्यास ४५ टक्के गुणांसह (राखीव वर्गगटातील असल्यास ४० टक्के) उत्तीर्ण केलेली असावी अथवा ते वरील विषयांसह बीएससी पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेला बसलेले असावेत.

निवड पद्धती: अर्जदारांपैकी पात्रताधारक विद्यार्थ्यांची निवड परीक्षा १६ जून २०१७ रोजी कोल्हापूर येथे घेण्यात येईल. अर्जदारांची पदवी परीक्षेतील गुणांची टक्केवारी व निवड परीक्षेतील गुणांकाच्या आधारे त्यांना एमएससी नॅनोसायन्स या अभ्यासक्रमात प्रवेश देण्यात येईल.

प्रवेश शुल्क: वरील दोन्ही अभ्यासक्रमांसाठी प्रवेश शुल्क म्हणून अर्जदारांनी २६ मे २०१७ पर्यंत ३०० रु, २ जून पर्यंत ४०० रु. तर ९ जून पर्यंत ९०० रु. प्रवेश शुल्क म्हणून भरणे आवश्यक आहे.

अधिक माहिती व तपशिलासाठी संपर्क: अभ्यासक्रमांच्या संदर्भात अधिक माहिती व तपशिलासाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर दूरध्वनी क्र. ०२३१- २६०९४९० वर संपर्क साधावा अथवा विद्यापीठाच्या

http://online.shivajiuniversity.in

अथवा

http:www.unishivaji.ac.in>Admission 2017 या संकेतस्थळाला भेट द्यावी.

अर्ज करण्याची पद्धत व शेवटची तारीख: संगणकीय पद्धतीने वरील संकेतस्थळांवर प्रवेश अर्ज करण्याची शेवटची तारीख ९ जून २०१७ आहे.

विज्ञान विषयातील ज्या विद्यार्थ्यांना नॅनो-सायन्स या क्षेत्रात पदवी व पदव्युत्तर शिक्षणासह आपले करिअर करायचे असेल तर अशांसाठी हे अभ्यासक्रम उपयुक्त ठरतील.

जनसंपर्क कक्ष
31 MAY 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात 'आव्हान'



आपण आयुष्यभर काही ना काही शिकतच असतो. त्यामुळे आपण एका अर्थाने विद्यार्थीच असतो. पण औपचारिक शिक्षण पद्धतीमध्ये विषेशत: महाविद्यालये आणि विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांनी, शिक्षणाबरोबरच आपला व्यक्तिमत्व विकास करणे अपेक्षित आहे. 'आत्मकेंद्री' विद्यार्थी न घडता व्यापक अर्थाने गाव, तालुका, जिल्हा, प्रदेश अशा स्तरावर आपले काही देणे आहे ही भावना त्यांच्यामध्ये वाढीला लावणे आवश्यक आहे. थोडक्यात, 'कम्युनिटी सर्व्हीस' या भावनेतून विद्यार्थी तयार होणे अपेक्षित आहे. राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना, आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण, शिवाजी विद्यापीठात येत्या जून महिन्यात 'आव्हान' या उपक्रमाच्या माध्यमातून देणार आहे. २००७ पासून 'आव्हान' हा आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम राज्यपाल कार्यालयाकडून आयोजित केला जातो. 'आव्हान' उपक्रमाची पहिली सुरूवात शिवाजी विद्यापीठापासूनच झाली. त्यानंतर महाराष्ट्रातील विविध १० विद्यापीठांनी हा उपक्रम आयोजित केला. यावर्षी 'आव्हान'चे यजमानपद शिवाजी विद्यापीठाला प्राप्त झाले आहे. राज्यातील कृषी-अकृषी अशी अठरा विद्यापीठे आणि १२०० विद्यार्थी-विद्यार्थिनी जिल्ह्यातून सहभागी होणार आहेत.

आपत्ती ही मानवनिर्मित किंवा नैसर्गिक असते. अचानक उद्धवणारी ती आपत्ती असे आपत्तीचे वर्णन केले जाते. 'आपत्ती व्यवस्थापन' कसे करावे? याविषयीचे प्रशिक्षण असल्यास कोणत्याही स्वरूपाच्या आपत्तीला सामोरे जाण्याचे मानसिक धैर्य आपल्यामध्ये निर्माण होऊ शकते. आपत्तीची अपेक्षा करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनापासून अशी परिस्थिती भविष्यात उद्भवल्यास काय करता येईल याविषयीचा विचार, माहिती आणि प्रशिक्षण आवश्यक आहे. महात्मा गांधींच्या प्रेरणेतून भारत सरकारच्या युवा आणि क्रीडा मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना या विभागाची स्थापना, गांधीजींच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने १९६९ ला करण्यात आली. युवकांनी कॅम्पस ते कम्युनिटी , कॉलेज ते गाव असे स्वत:ला जोडावे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. सध्या देशातील २९८ विद्यापीठातून ३२ लाख विद्यार्थी या योजनेत सहभागी आहेत. महाराष्ट्राचा विचार करता शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत १९६९ ला योजनेची सुरूवात झाली. सध्या या अंतर्गत २०० संघ व वीस हजार विद्यार्थी संलग्नित आहेत. आव्हानसाठी विविध समित्या तयार करण्यात आल्या असून, पुण्याच्या नॅशनल डिझास्ट्रर रिस्पॉन्स फोर्सच्या (एनडीआरएफ) माध्यमातून, विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. आपत्ती व्यवस्थापनाचा विचार करता कोणत्याही प्रकारच्या आपत्तीमध्ये काय करावे? आणि काय करू नये? याला अधिक महत्व आहे. भीतीने, आपली आहे ती क्षमता, आपण गमावून बसतो, हे वास्तव आहे. २००५ साली भारत सरकारने डिझास्टर मॅनेजमेंट ॲक्ट हा मंजूर केला आणि त्यानुसार पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखली द नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंट ऑथॉरिटी स्वतंत्रपणे स्थापन करण्यात आली आहे. राज्य आणि जिल्ह्याच्या ठिकाणी आपत्ती निवारण कक्ष कार्यरत आहेत.

भूकंप, त्सुनामी, ज्वालामुखीची स्फोट, लाव्हा, वादळे, वीज पडणे, अतिवृष्टी, वाळुची वादळे, अति हिमवर्षाव, उष्ण-शीत लहरी, कडाक्याचा हिवाळा, पूरस्थिती, दरडी कोसळणे, दुष्काळ, जंगलात आग लागणे, वणवा, रोगराईचा प्रसार अशी अनेक नैसर्गिक आपत्तीचे प्रकार आहेत तर मानवनिर्मित आपत्तींमध्ये न्युक्लीअर, रेडिओलॉजी उत्सर्ग यांचा प्रामुख्याने समावेशकरता येतो. याविषयीचा अनुभव आपण जपानच्या त्सुनामीच्या वेळी घेतलेला आहे. समुद्री जीवनावर झालेले घातक परिणाम हा जगाचा चिंतेचा विषय आहे. आफ्रिकेतील इबोला हा आजार विषाणूपासून तयार झालेला आहे. इबोला हे अलिकडचे उदाहरण आहे. भोपाळच्या युनियन कॉर्बाईड कंपनीतील विषारी वायुगळती, चेन्नईतील पूरस्थिती, तसेच जलाशये, नदी, तलाव यातील प्रदूषण, उत्तराखंडमधील घटना या भारतातील मानवनिर्मित आपत्तींची काही उदाहरणे आहेत.

'आव्हान'मधून प्रशिक्षण घेतलेल्या चॅन्सलर ब्रिगेडने आपत्तीच्यावेळी मदत व सहाय्य करणे अपेक्षित आहे. आपत्ती व्यवस्थापनामध्ये परिस्थिती नियंत्रणातून ठेवून, मनुष्यबळ व मालमत्तेची अधिक हानी होऊ न देता, तत्पर सहाय्य करणे आवश्यक असल्याने चॅन्सलर ब्रिगेडची मदत ही जिल्हा आपत्ती निवारण कक्षाला करणे हादेखील आव्हानचा हेतू आहे. आव्हानच्या माध्यमातून व्याख्याने, प्रशिक्षण त्याचबरोबर दोन बेस्ट कॉन्टीजंट व इतर पुरस्कार, प्रमाणपत्रे व फिरती ट्रॉफी दिली जाणार आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचा आव्हान हा उपक्रम समाजासाठी नक्कीच लाभदायी ठरेल, यात शंका नाही.

• डॉ. निशा मुडे-पवार
nishapawar1968@rediffmail.com